# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दूरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०३/०४/२०२४

# प्रेसनोट

### रस्ते, धूळ बाबत नागरिकांच्या तक्रारींची आयुक्तांनी घेतली दखल!

दिनांक ३ एप्रिल २०२४ रोजी उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त अजिज शेख व अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांनी शहरातील सुरू असलेल्या विविध विकास कामांची पाहणी केली.

यामध्ये प्रामुख्याने भुयारी गटार योजनेचे काम, MMRDA अंतर्गत सुरू असलेली रस्त्यांची कामे, पाणीपुरवठ्याची कामे व बांधकाम विभागामार्फत सुरू असलेली इतर रस्ते व नाल्यांची कामे यांची प्रगती व त्या अनुषंगाने नागरिकांच्या असलेल्या तक्रारींची दखल घेऊन प्रत्यक्ष जागेवर जाऊन नागरिकांचे म्हणणे ऐकून घेतले.

सोबत महानगरपालिकेचे पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता, परमेश्वर बुडगे, बांधकाम विभागाचे अभियंता तरुण सेवकानी व महानगरपालिकेचे प्रकल्प सल्लागार तसेच कामाचे कंत्राटदार यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कामाची गती वाढवण्यासाठी आयुक्तांनी कंत्राटदारास निर्देश दिले. धुळीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी रस्त्याची कामे तातडीने करण्याच्या सूचना दिल्या. कामाच्या ठिकाणी सुरक्षाविषयक उपाययोजना करणे, कामाची गुणवत्ता ठेवणे याबाबत निर्देश दिले.

३/४/२४

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.